दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं/जनसंपर्क/प्रेस नोट/३९

# पत्रकार टिपणी

## पारस प्रकल्प येथील २५० मेगावॅट नवीन संचाचे यशस्वी सिंक्रोनायझेशन

महानिर्मितीच्या पारस विस्तारित औष्णिक प्रकल्प २५० मेगावॅट संच क्रमांक ४ चे दिनांक ३०.११.२००९ रोजी सकाळी ०६.१२ वाजता यशस्वी क्रियान्वयन (सिंक्रोनायझेशन) होऊन प्रकल्प एक तास साधारणपणे २५ ते २८ मेगावॅट या क्षमतेवर यशस्वीरित्या चालविण्यात आला. यासाठी दि. २८ नोव्हेंबर २००९ रोजी या संचाचे बॉयलर प्रदीपन करण्यात आले होते. पारस विस्तारित प्रकल्प संच क्र. ४ चा हा महत्त्वाचा टप्पा पार पाडण्यासाठी प्रकल्प विभागाचे मुख्य महाव्यवस्थापक, श्री. आर.एच. गौर, मुख्य महाव्यवस्थापक (बांधकाम) श्री. अशोक जोहरी, तसेच पारस विस्तारित प्रकल्पाचे महाव्यवस्थापक श्री. अनिल नंदनवार यांनी तसेच त्यांच्या अधिपत्याखाली काम करणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी अहोरात्र परिश्रम करुन सदरचा मैलाचा टप्पा पार पाडण्यासाठी योगदान दिले. संचालक (प्रकल्प) श्री. चंद्रकांत थोटवे यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाखाली हा टप्पा पार पडला. प्रकल्पस्थळी सुरु असलेल्या सर्व कामांचा सातत्याने पाठपुरावा करुन सर्व कामे गतीने पूर्ण करण्यास त्यांनी प्राधान्य दिले होते. राज्याचे उर्जामंत्री मा.ना.श्री. अजित पवार यांनी हा प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यासाठी महानिर्मितीला दिलेल्या निर्देशानुसार सदर संच हा जानेवारी २०१० पर्यंत पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होऊन वीजनिर्मिती करेल, असे नियोजन करण्यात आले आहे.

याप्रसंगी महाव्यवस्थापक श्री. सुभाष नेमाडे, तसेच प्रकल्प विभागातील अधीक्षक अभियंते सर्वश्री. एस.एस. तारे, एम.डी. गोडवे तसेच भारत हेवी इलेक्ट्रीकल्स लि. चे श्री. भाराशंकर, श्री. मोहती प्रामुख्याने उपस्थित होते.

राज्याला अधिक वीज प्राप्त होण्यासाठी सहाय्यभूत ठरणारा हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असा आजचा टप्पा गाठल्याबद्दल महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुब्रत रथो, संचालक (वित्त) श्री. गुलाबसिंग गिरासे, संचालक (प्रकल्प) श्री. चंद्रकांत थोटवे, संचालक (संचलन) श्री. मधुकर शेलार, कार्यकारी संचालक (प्रकल्प) श्री. अरुण डवलेकर, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद चौधरी यांनी सर्व संबंधित तंत्रज्ञ-अभियंत्यांचे अभिनंदन केले आहे.

---

दिनांक : ३०/११/२००९.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**